।। सा विद्या या विमुक्तये।।

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णुपूरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

**"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)**

**Established on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade**

Phone : (02462) 229246
Fax : (02462) 229572

**CENTER FOR COMPETITIVE EXAM. TRAINING & SKILL DEVELOPMENT**

Website : www.srtmun.ac.in
E-mail : cesdsrtmun@gmail.com


संदर्भ :स्पर्धा/परि/प्रशि/२०१८–१९/२७३ दि. १७/०१/२०१९

## परिपत्रक

प्रति,
१) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.
२) मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.
३) मा. संचालक, विद्यापीठ उपकेंद्र, पेठ, ता.जि.लातूर.
४) मा. प्राचार्य, न्यू मॉडेल कॉलेज, हिंगोली.

विषय : रौप्य महोत्सव २०१९ च्या अनुषंगाने कुलगुरू स्पर्धा परीक्षा चषका बाबत.

महोदय/महोदया,

आपणास विदितच आहे की, सदरील वर्ष सन २०१९ हे आपल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे रौप्य वर्ष आहे. या अनुषंगाने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व द युनिक ॲकॅडमी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रौप्य महोत्सव २०१९ 'कुलगुरू स्पर्धा परीक्षा चषक' आयोजित करण्यास आम्हास मनस्वी आनंद होत आहे. रौप्य महोत्सव २०१९ च्या कुलगुरू स्पर्धा परीक्षा चषकासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याशी संलग्न उपकेंद्र व महाविद्यालये यांना यात सहभागी होता येईल.

सहभागी उपकेंद्र/महाविद्यालये किंवा विद्यार्थ्याकडून यासाठी कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परीक्षेत्रातील विद्यार्थ्यांना UPSC/ MPSC परीक्षांविषयी रूची वाढावी आणि त्याद्वारे भविष्यकाळात उत्तमोत्तम प्रशासकीय अधिकारी निर्माण व्हावेत,हया हेतूने विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त हे विधायक पाऊल उचलण्यात आलेले आहे. तरी विद्यापीठ परीक्षेत्रातील विद्यार्थ्यांना कुलगुरू स्पर्धा परीक्षा चषका बाबत प्राथमिक माहिती उपलब्ध करून आपण सहकार्य करावे आणि विद्यार्थांचे उद्‌बोधन करून त्यांना या स्पर्धेत सहभागी होण्यास प्रेरित करावे त्यासाठी महाविद्यालयाने दि. ३०/०१/२०१९ सायंकाळी ०५ वाजेपर्यंत आपला एक संघ निवड करून त्यांचा तपशिल सोबतच्या आवेदन पत्रात भरून (६ विद्यार्थ्यांचा एक संघ – ०३ मुले व ०३ मुली) स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण आणि कौशल्य विकास केंद्र, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. येथे पाठवून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

समन्वयक
डॉ. नितीन श्रीधर दारकुंडे
स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण आणि कौशल्य विकास केंद्र.

सोबत :
कुलगुरू स्पर्धा परीक्षा चषकाची रूपरेषा .

## कुलगुरू स्पर्धा परीक्षा चषकाची रूपरेषा

१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याशी संलग्न उपकेंद्र व महाविद्यालये यांना यात सहभागी होता येईल.

२) सहभागी उपकेंद्र/महाविद्यालये किंवा विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही.

३) सहभागी महाविद्यालयांनी आपल्या एका संघाची निवड करावी. सदर संघ निवडीचा अधिकार फक्त प्राचार्य/ संचालकाचा असणार आहे.
(६ विद्यार्थ्यांचा एक संघ — ०३ मुले व ०३ मुली )

४) सदर स्पर्धा ही प्रश्नमंजुषा ‘Quiz Contest’ स्वरूपाची असेल.

५) या स्पर्धेत सहभागी संघाला स्पर्धा परीक्षेच्या धर्तीवर आधारीत अभ्यासक्रमावर प्रश्न विचारले जातील.

६) प्रत्येक प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी संघास ३० सेकंदाचा अवधी देण्यात येईल.

७) सदर स्पर्धा ही बाद फेरी प्रमाणे आयोजित केली जाईल. ज्यात प्रश्न विचारल्या नंतर प्रथम प्रतिसाद देणाऱ्या संघास प्रथम संधी मिळेल, परंतु उत्तर चूकीचे असल्यास सदर प्रश्नाचे उत्तर देण्याची संधी प्रतिस्पर्धी संघास मिळेल.

८) अंतिम फेरीतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांचे संघ व त्यांचे मा. प्राचार्य यांचा सत्कार माननीय कुलगुरू स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या हस्ते अंतिम फेरीच्या वेळी करण्यात येईल.

९) सहभागी उपकेंद्र /महाविद्यालये किंवा विद्यार्थ्याकडून कुठल्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणर नाही. परंतु सहभागी संघास स्पर्धेत कोणत्याही टप्प्यावर प्रवास व आहार भत्ता (T.A/D.A) दिला जाणार नाही.

१०) या स्पर्धेचे पारितोषिक खालील प्रमाणे राहील.
प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या संघास रू. ३१०००/—, स्मृती चिन्ह व प्रशस्तीपत्र,
द्वितीय क्रमांक पटकाविणाऱ्या संघास रू. २१०००/—, स्मृती चिन्ह व प्रशस्तीपत्र आणि
तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या संघास रू. ११०००/—,स्मृती चिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात येईल.

११) सहभागी संघातील स्पर्धकांची येण्या—जाण्याची जबाबदाबरी वैयक्तिक स्वरूपाची असेल.त्यास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व द युनिक ॲकॅडमी, पुणे हे जबाबदार असणार नाही.

१२) सदर स्पर्धा तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या महाविद्यालयात आयोजित केली जाईल आणि या स्पर्धेची उपांत्य व अंतिम फेरी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या प्रांगणात आयोजित केली जाईल.

१३) स्पर्धेसंदर्भात कोणताही बदल करण्याचा हक्क स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व द युनिक ॲकॅडमी, पुणे यांच्याकडे राखून ठेवलेला आहे.

१४) **कुलगुरू स्पर्धा परीक्षा चषक नियम व अटी**
अ) स्पर्धेदरम्यान महाविद्यालय/उपकेंद्राचे ओळखपत्र आणने अनिवार्य असेल.
ब) स्पर्धकाकडून कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन आढळल्यास स्पर्धकास स्पर्धेतून बाद करण्यात येईल.
क) स्पर्धेदरम्यान प्रश्न निवडीचा व योग्य उत्तरासंबंधी पंचांचा निर्णय अंतिम असेल.
ड) स्पर्धकाने संघात सहभागी झाल्यानंतर त्यास संघ बदलता येणार नाही.
इ) सदर स्पर्धा वैकल्पीक प्रश्नांच्या धर्तीवर असेल व यात सहभागी संघास योग्य उत्तर देण्याकरीता ३० सेकंदाचा अवधी मिळेल.

१५) <u>कुलगुरू स्पर्धा परीक्षा चषक प्रश्नमंजुषा अभ्यासक्रम</u>

१) इतिहास :— प्राचीन,मध्ययुगीन,आधुनिक भारत.
२) भूगोल :— जगाचा व भारताचा भूगोल.
३) भारतीय अर्थव्यवस्था :— अर्थव्यवस्थेशी निगडीत मुलभूत संकल्पना,दारिद्रय,बेरोजगारी, कृषी व्यवस्था
४) भारतीय राज्यघटना :— राज्यघटना, राजकीय व्यवस्था, पंचायत राज, नागरी शासन व्यवस्था.
५) सामान्य विज्ञान :— भौतिकशास्त्र, जीवशास्त्र,रसायनशास्त्र.
६) विज्ञान तंत्रज्ञान :— जैवतंत्रज्ञान, संगणक व माहिती तंत्रज्ञान, उर्जा, अवकाश तंत्रज्ञान.
७) चालू घडामोडी :— राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, प्रादेशिक.

१६) सर्व संलग्नित महाविद्यालय, विद्यापीठ उपकेंद्र, संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ परिसर, नांदेड व प्राचार्य, न्यू मॉडेल कॉलेज, हिंगोली यांनी दि. ३०/०१/२०१९ रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यंत आपला एक संघ निवड करून (६ विद्यार्थ्यांचा एक संघ — ०३ मुले व ०३ मुली) स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण आणि कौशल्य विकास केंद्र, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे पाठवा.नंतर आलेले आवेदन पत्र स्वीकारले जाणार नाही.

१७) सदर स्पर्धा ही फेब्रुवारी २०१९ मध्ये घेण्यात येईल.प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी असणाऱ्या स्पर्धेचे वेळापत्रक दि. ३०/०१/२०१९ नंतर संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

१८) संघ खाली दिलेल्या विहीत आवेदनपत्रात भरून पाठवावा. (६ विद्यार्थ्यांचा एक संघ —०३ मुले व ०३ मुली)

| अ. क्र | विद्यार्थ्यांचे नाव | महाविद्यालय/संकुलाचे नाव | विद्यार्थ्यांचा फोटो | विद्यार्थ्यांचा मोबाईल नंबर | प्राचार्य / संचालक नाव व स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |

सदरील आवेदनपत्राची soft copy खालील e-mail वर पाठवावी. हार्ड कॉपी पाठविणे पण बंधनकारक असणार आहे.
E-mail : cesdsrtmun@gmail.com, darkundenitin@gmail.com

१९) संपर्क : स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण आणि कौशल्य विकास केंद्र, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

डॉ. नितीन श्रीधर दारकुंडे : ८२७५२६८८९५
श्री पवार गणेश हरी : ९१७५९४४४३४
E-mail : cesdsrtmun@gmail.com

समन्वयक
डॉ. नितीन श्रीधर दारकुंडे
स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण आणि कौशल्य विकास केंद्र

प्रत माहितीस्तव :
१) मा. कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
२) मा. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
३) मा. समन्वयक, द युनिक ॲकॅडमी, नांदेड.